महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व पंचायत राज विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र ०२२-२२०६ ०४४६ ईमेल आयडी : sec.rdd@maharashtra.gov.in

मा. सचिव (ग्रामविकास व पंचायतराज विभाग) यांनी विभागातील सह/उप सचिव, जिल्हा परिषदेतील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या समवेत व्हीसी द्वारे दिनांक ३०.१०.२०२६ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त- गुरुवार, दि.०५.११.२०२६

१. विधीमंडळाची प्रलंबित आयुधे याबाबत दि. २९.१०.२०२६ रोजी तदर्थ समितीच्या बैठकीमध्ये मा. उपसभापती यांनी आढावा घेतला तसेच विभागातील सह/उपसचिव यांच्याशी बैठक घेतली असता वेगवेगळ्या जिल्ह्यांकडे विधीमंडळ प्रलंबित आयुधांची माहिती अप्राप्त आहे. ही बाब अतिशय गंभीर असुन कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जिल्हापरिषद अंतर्गत प्रलंबित सर्व आयुधांची माहिती स्वत:च्या सहीने दि.०३.११.२०२६ पर्यंत विभागाकडे पाठविण्यात येईल याची व्यक्तिश: खात्री करावी. विधीमंडळाची प्रलंबित सर्व आयुधे एक आठवड्याच्या आत निश्चितपणे मा.मंत्री महोदय यांचेकडे मान्यतेसाठी सादर केली जातील याची दक्षता घ्यावी.

२. विधिमंडळ आयुधांशी संबंधित कोणतेही पत्र प्राप्त झाल्यानंतर,सदर पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वैयक्तिक टपालामध्ये निश्चितपणे घेतलं गेलं पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः संबंधित विभाग प्रमुखांना सूचना देऊन, दिलेल्या कालावधीमध्ये त्याचे उत्तर स्वतःच्या स्वाक्षरीने न चुकता विभागास सादर करावयाचे आहे.

३. मा.मुख्य सचिव यांच्या स्वाक्षरीने जिल्हा परिषदांकडे प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण कशा पद्धतीने करावे, यासाठी परिपत्रक काढण्यात आलेले आहे त्याचे तंतोतंत पालन केले जाईल, याची खबरदारी घ्यावी. तक्रारीं प्रमाणेच विधिमंडळ आयुधांचा देखील दर आठवड्याला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आढावा घ्यावा.

४. प्रत्येक ग्रामपंचायत मधील आपले सरकार सेवा केंद्र स्टँडर्डाइज केले जाईल याची काळजी घ्यावी. ही सर्व केंद्र चालू राहिली पाहिजेत आणि तेथून नागरिकांना आरटीएस मधील सर्व सेवा तसेच इतर विभागांच्या सेवा नियमितपणे दिल्या गेल्या पाहिजेत. याचा आढावा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत यांनी दरमहा घेतलाच पाहिजे. याच पद्धतीने सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी देखील हा आढावा नियमितपणे घ्यावा. आपले सरकार सेवा केंद्राच्या संगणक चालकांना मानधन देण्यासाठीचा निधी अनेक जिल्ह्यांकडून वेळेत संचालकांकडे जमा केला जात नाही, ही गंभीर बाब आहे. याबाबतीत काही जिल्ह्यांच्या मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांच्या बाबतीत मा.मंत्री महोदय यांचेकडे गंभीर तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन कोणत्याही परिस्थितीत अशी अडवणूक होत असेल तर संबंधित कॅफो यांचे विरुद्ध तात्काळ निलंबनाची कार्यवाही प्रस्तावित करावी.

५. RTS- District wise chart मधील आकडेवारी पहाता, प्रगती अत्यंत असमाधानकारक असुन रिजेक्शनचे प्रमाण अतिशय जास्त आहे. RTS मध्ये देण्यात येणाऱ्या फक्त ०७ सेवा आहेत, याबाबतची सर्व जिल्हा परिषदांचे गुणांकन १ महिन्यात १० पैकी १० होईल याप्रमाणे कार्यवाही करावी.

६. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान पूर्ण ताकदीने जिल्ह्यात राबवले जाईल,सर्व ग्रामपंचायती यामध्ये सहभागी होतील याची काळजी घ्यावी. ज्या ग्रामपंचायतींचा परफॉर्मन्स चांगला आहे अशा २०% ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष पारितोषिकांच्या स्पर्धेत उतरविण्यात यावे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपासून ते ग्रामसेवकांपर्यंत सर्वांनी शासन निर्णय काळजीपूर्वक अभ्यासून सर्व घटकांची तंतोतंत अंमलबजावणी केली जाईल याची काळजी घ्यावी.

७. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत अहिल्यानगर आणि अमरावती जिल्हा परिषदेत जिल्हा स्तरीय कार्यशाळा घेण्यात आल्या, इतरही जिल्ह्यांनी सदर कार्यशाळा घ्याव्यात. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत १००% ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदवुन किमान ७०% गुण मिळविणे आवश्यक आहे.

८. मा.मंत्री महोदयांच्या निर्देशानुसार दिपावली नंतर विभागीय दौरे करण्यात येणार आहेत. विभागीय स्तरावर बैठका घेण्यात येणार आहेत. तोपर्यंत सर्व जिल्हास्तरीय प्रशिक्षणे पुर्ण करण्यात यावी. सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे Sensitization होवून सर्व यंत्रणा कामाला लागेल याची दक्षता घ्यावी.

९. विकसित महाराष्ट्र, MSRLM, PMAY-G या महत्त्वाच्या बाबी आहेत. आपल्या यंत्रणांमार्फत योग्य प्रकारे वरील योजना राबविण्यात येईल याची काळजी घेण्यात यावी. MSRLM चा आढावा आपल्या स्तरावर घ्यावा व त्यामधुन विविध बचत गटामार्फत महिला, शेतकरी, दिव्यांग यांना एकत्र आणून त्यांना वित्त पुरवठा करण्यात यावा.

१०. सोलर प्रकल्पाबाबत माहिती व प्रस्ताव विभागाकडे पाठविण्यात यावेत.

११. जिल्हा परिषद (खुद्द) व पंचायत समिती (खुद्द) मुख्यालयात किती पदे मंजुर आहेत याबाबतची माहिती देण्यात यावी, जेणेकरुन जिल्हा परिषद इमारतीच्या जागा बाबतचे नियोजन करता येईल.

१२. चार विभागांच्या सचिवांनी एकत्रित घेतलेल्या बैठकीमध्ये दुष्काळा संबंधित सूचना दिलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालन करून दुष्काळ निवारणाची कामे, जलसंधारणाची कामे प्राथम्याने करावीत. याच बैठकीमध्ये सर्व जिल्हा परिषदांनी एक ऑक्टोबर रोजी रिक्त असलेल्या सर्व संवर्गाच्या पदांची माहिती पाठविण्यासाठी सूचना दिल्या होत्या, ही माहिती कोणत्याही परिस्थितीत दि.०७ नोव्हेंबर च्या आत पाठविण्यात यावी.

१३. पदनिर्मिती:- ग्रामविकास विभागाच्या आकृतीबंधानुसार दि.०१.१०.२०२६ रोजी जिल्हा परिषद स्तरावरील आकृतीबंधानुसार मंजुर पदे, रिक्त पदे यांची विभागनिहाय माहिती विभागाकडे पाठविण्यात यावी. पुढील ०७ दिवसात अचुक माहिती देण्यात यावी.

१४. भटक्या श्वानांच्या बाबत ९ जिल्हयांची माहिती अद्यापही अप्राप्त आहे. प्राप्त माहिती मध्ये तफावत असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीनेच अचुक माहिती तात्काळ देण्यात यावी.

(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)
सचिव (ग्राम विकास व पंचायत राज विभाग)

प्रत- १) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.

२) सर्व सह/ उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.